दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 17 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 32 ● Pages 4 ● Rate 4 Rs





# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पुन्हा लांबणीवर:कोर्टाची जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात आज महत्त्वाची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी सर्व जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच निवडणूक आयोगाला नोव्हेंबर २०२५ पर्यंत ईव्हीएम मशीन उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सूचना देण्यात आल्या.गेल्या काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या निवडणुकांना गती मिळणार आहे. न्यायालयाने दिलेल्या मुदतीनुसार, सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला ठराविक वेळेत निवडणूक प्रक्रिया पार पाडावीच लागणार आहे.मे महिन्यात झालेल्या सुनावणी वेळी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र सरकारला चार महिन्यांत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्याशिवाय जर ते शक्य नसेल, तर वेळ वाढवून घेण्यासाठी आमच्याकडे यावे लागेल, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते.त्यानंतर निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू झाली. अनेक महापालिकांमधील प्रभाग रचना जारी करण्यात आली. जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानंतर आज राज्य आयोगाने सुप्रीम कोर्टात आज अर्ज दाखल करत आम्हाला जानेवारी २०२६ पर्यंत मुदत वाढवून द्यावी, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली.सुनावणीदरम्यान न्यायालयाने आयोगाला सप्टेंबरपासून जानेवारीपर्यंत एवढा मोठा अवधी का हवा? अशी विचारणा केली. यावर ईव्हीएम मशीनची उपलब्धता नसणे, आगामी काळातील सण-उत्सव, विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि कर्मचाऱ्यांची कमतरता, अशी कारणे आयोगाच्या वतीने देण्यात आली. निवडणूक आयोगाने मांडलेल्या कारणांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देत असल्याचे



सांगितले. त्यामुळे आता जानेवारी २०२६ अखेरपर्यंत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे बंधनकारक ठरणार आहे.दरम्यान, ओबीसी आरक्षणामुळे यावर्षी निवडणुका होऊ शकल्या नाहीत. आम्हाला अपेक्षित होत की चार महिन्यांत निवडणुका व्हाव्यात. आम्हाला वाटत होते की, या महिन्याच्या शेवटी निवडणुका होतील. आज प्रकरण सुनावणीसाठी आल्यावर राज्य निवडणूक आयोग अर्ज करतेय की, आणखी निवडणुका पुढे ढकला. निवडणुका आणखी सूचीबद्ध झाल्या नाहीत. त्या व्हायला पाहिजे होत्या, अशी स्पष्ट नाराजी सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली.दरम्यान, ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा असे सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केले आहे. ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिले असल्याचे कोर्ट म्हणाले. मागील सुनावणीवेळी चार महिन्यांत निवडणुका घेऊ म्हणणाऱ्या निवडणूक आयोगाचा हलगर्जीपणा झाल्याचे दिसत आहे, अशी टिप्पणी देखील सर्वोच्च न्यायालयाने केली.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारी २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत आणि पंचायत समितांच्या निवडणुका घेऊन निकालही जाहीर करावा लागेल. एकंदरित जानेवारी अखेर सगळी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे आव्हान राज्य निवडणूक आयोगासमोर असणार आहे.

## माजलगाव बाजार समिती कै.वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्काराने उपसभापती श्रीहरी मोरे सन्मानित

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी संघाच्या सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार स्विकारला.




महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणा-या बाजार समित्यांना हा पुरस्कार देउन सन्मानित केले जाते. माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीने वार्षीक सभा घेणे, नियमीत वेळेवर लेखापरिक्षण करणे, दोष दुरूस्ती अहवाल, शेतक-यांसाठी नाममात्र दरात भोजन व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, पार्कींग व्यवस्था अशा विवीध शेतकरी हिताच्या योजना राबवत उत्कृष्ट असे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीला सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे हा पुरस्कार स्विकारला यावेळी संचालक आसाराम घायतिडक, भगवान आगे, आबाजी भोसले, संजय कचरे, सचिव एच. एन. सवणे, लेखापाल उध्दव फपाळ, नितीन पौळ, सुमित पौळ, गणपतराव कदम, दिनानाथ शेंडगे यांची उपस्थिति होती.

## एम.के.डी.स्कूल आणि कॉलेजचे ४ विद्यार्थी विभागीय तेंग सु डो स्पर्धेसाठी पात्र

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय शालेय तेंग सु डो स्पर्धेत एम.के.डी. इंग्लिश मीडियम स्कूल आणि एम.के.डी. आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांनी प्रभावी कामगिरी करत विभागीय स्पर्धेत आपली जागा निश्चित केली आहे. १५ सप्टेंबर रोजी चावरा इंग्लिश स्कूल, नंदुरबार येथे ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत पात्र ठरलेल्या खेळाडूंची नावे खालीलप्रमाणे आहेत:

अंडर-१४ मुली: तेजस्विनी तडवी
अंडर-१७ मुले: सोहम कोकणी
अंडर-१९ मुली: अंजली शर्मा
अंडर-१९ मुले: चंद्रकांत कोकणी



या प्रमुख खेळाडूंसोबतच समीर वळवी, हर्षल पाडवी आणि पुर्वेश चौधरी यांनी दुसरा क्रमांक पटकावला, तर दर्शना सैदाने आणि रोहन कोकणी यांनी तिसरा क्रमांक मिळवला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संचालक शुभम किशोर दराडे, प्रशासकीय अधिकारी सचिन भोंगळे आणि शाळेचे प्राचार्य जिनेश के. यू. यांनी अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छाही दिल्या.

या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आपले मार्गदर्शक आणि क्रीडा शिक्षक प्रशांत शिंदे, प्रशिक्षक जगदीश जाधव, तसेच क्रीडा शिक्षक योगेश मोरे, चंद्रकांत बारस्कर आणि गौरव कोळी यांच्या योग्य मार्गदर्शन आणि सहकार्याला दिले आहे.

## केज येथे कार पुलाला धडकून दोघांचा मृत्यू

**केज । गौतम बचुटे**

केज-मांजरसुंबा महामार्ग क्र. ५४८-डी वर आज सकाळी झालेल्या भीषण अपघातात कार पुलाला धडकून दोघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये परळी येथील नामांकित पादत्राणे व्यापाऱ्याचा समावेश असून अपघाताने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

आज सकाळी सुमारे सहा वाजता केजजवळील कदमवाडी पाटी शेजारी भरधाव कार (क्र. एमएच-०२/सीएच-६७८९) पुलाला धडकली. या अपघातात इम्रान इब्राहिम कच्छी (वय ५०, रा. परळी) हे चप्पल-बूटांचे होलसेल व्यापारी आणि गाडी चालक अझरुद्दीन बाबुमिया शेख या दोघांचा जागीच मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक बारगजे व पोलिस जमादार रशीद शेख हे तत्काळ घटनास्थळी



पोहोचले. त्यांनी दोन्ही मृतदेह तातडीने उपजिल्हा रुग्णालयात हलविले. तसेच पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक सोनवणे, पोलिस नाईक शेख रशीद व वाहनचालक रामहरी शिंदे यांनी घटनास्थळी हजेरी लावून नागरिकांच्या मदतीने मृतदेह म्ब्युलन्समधून हलविण्यासाठी सहाय्य केले.

## सततच्या पावसामुळे तळोदा तालुक्यात कापूस पीक उद्ध्वस्त; शेतकरी संकटात

**बोरद । मंगेश पाटील**

तळोदा तालुक्यातील बोरद परिसरात गेल्या दीड महिन्यापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. सततच्या पावसामुळे या भागातील कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अजूनही पाऊस थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत.यावर्षी बोरद आणि आजूबाजूच्या गावांमध्ये, जसे की बन जुवानी, खरवड, मोड, करडे, मालदा, तुळाजा, कलमाडी, मोहीदा, तऱ्हावद, खेडले, तळवे, मोरवड, धानोरा, धनपूर, लाखापूर फॉरेस्ट आणि गोडाले न्यू बन, कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड



करण्यात आली होती. मात्र, गेल्या दीड महिन्यापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे कापूस पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. अनेक ठिकाणी उभे पीक उन्मळून पडले असून, झाडांवरील पाने, फुले आणि बोंडे गळून पडताना दिसत आहेत.

शेतकरी दरवर्षी महागडी बियाणे आणि शेतीची कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करतात. ते कापूस, सोयाबीन, ऊस, मिरची, मका, पपई आणि केळी अशा विविध पिकांची पेरणी करतात. मात्र, दरवर्षी पावसाच्या लहरीपणामुळे त्यांना नुकसानीला सामोरे जावे लागते. कधी अतिवृष्टीमुळे पिके वाहून जातात, तर कधी पाऊसच न झाल्याने पिके जळून जातात. यावर्षीही, निझरी नदीच्या पुरामुळे शेतातील पिके वाहून गेली आहेत. पिकातून येणाऱ्या उत्पन्नाला बाजारात योग्य भाव मिळत नाही आणि केलेला खर्चही निघत नाही. यामुळे शेतकरी नेहमीच कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडतात.या गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी केली आहे. तसेच, शासनाने सरसकट एकरी भरपाई देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## 'नंदुरबार जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' सुरू: ग्रामपंचायतींच्या सक्षमीकरणावर भर

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतींना अधिक सक्षम आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने नंदुरबार जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' सुरू करण्यात आले आहे. 'सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र' हे ध्येयवाक्य घेऊन सुरू झालेल्या या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. या अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासाला गती मिळणार असून, गावांमध्ये सुशासन, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते तळोदा तालुक्यातील सोमावल बुद्रुक आणि राजविहीर या दोन ग्रामपंचायतींमध्ये या अभियानाचे उद्घाटन झाले. सकाळी ९ वाजता सोमावल



बु. येथे आणि त्यानंतर सकाळी ११ वाजता राजविहीर येथे उद्घाटन समारंभ पार पडला. या वेळी गट विकास अधिकारी राजू किरवे, सहाय्यक गट विकास अधिकारी काशीराम पवार, राजविहीरच्या सरपंच उषा वळवी, उपसरपंच प्रकाश पाडवी यांच्यासह माजी पंचायत समिती सभापती सतीश वळवी, आकाश वळवी यांच्यासह, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता सबवे यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी रत्नाकर शेंडे यांनी केले. 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानामुळे नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.'




संपादकीय

# महागाईचा जनतेला हादरा




रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाईचा दर गेले नऊ महिने सातत्याने घसरत होता आणि लोकांनाही हायसे वाटले होते. पण ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईच्या दरात वाढ झाली आहे आणि हा दर १.६१ टक्के इतका झाला आहे. हा दर किरकोळ वाटू शकतो, पण सध्या जनता ज्या महागाईच्या वणव्यात होरपळत आहे ते पाहता हा दर खूप जास्त आहे. सामान्यतः महागाईचा दर वाढला आहे ते हिरव्या भाज्या आणि मासे तसेच अंडी या आवश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढीमुळे. नोव्हेंबर २०२४ पासून महागाईचा दर सतत कमी होत होता. पण ऑगस्ट २०२५ मध्ये मात्र अचानक तो वाढला. त्याला कारणे अर्थातच अर्थशास्त्रीय आहेत. आधीच्या उच्च बेस इफेक्टचा परिणाम कमी झाल्यामुळे ही वाढ नोंदवली गेली असा अर्थशास्त्रीय निष्कर्ष आहे, पण सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे तर जनता अगोदरच महागाईने मेटाकुटीला आली होती, त्यात आता या किरकोळ महागाईमुळे ती जेरीस आली आहे. बेस इफेक्ट म्हणजे अगोदरच्या वर्षांपेक्षा या वर्षीत किती किमती बदलल्या आहेत आणि त्या निकषावर महागाईचा फटका जास्त बसत आहे. महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला देण्यात आले होते. त्या निकषानुसार पाहिले असता हा महागाईचा दर सामान्यतः आटोक्यात आहे. पण जनतेला या विश्लेषणाची सवय नसते आणि तिला महागाईचे कारण काय याच्या कारणातही काहीही रस नसतो. त्यांना रस असतो तो महागाई किती आहे आणि कोणती स्वस्त वस्तू आहे आणि कोणती महाग आहे यातच. त्या दृष्टीने निश्चितच हा दर चिंताजनक आहे. यंदा पावसामुळे कित्येक धान्ये सडून गेली आहेत आणि कित्येक पिकं तर येण्याची शक्यताच दिसत नाही. या परिस्थितीत धान्य महागाई काही प्रमाणात का होईना पण वाढली आहे. मोदी सरकारसाठी ही भूषणावह बाब नाही. कारण मोदी यांनी सबका साथ सबका विकास असा नारा दिला होता आणि त्यामुळे ते सत्तेवर येताच जनतेला हायसे वाटले होते.काँग्रेसच्या काळात महागाईने कहर केला होता आणि साध्या गोष्टी जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या होत्या. मोदी सरकार सत्तेवर येताच जनतेला 'अच्छे दिन' आल्याची खात्री पटली होती. पण अचानक महागाईच्या दरात किरकोळ का होईना पण वाढ झाल्याचे दिसल्याने जनता त्रस्त आहे. त्यातच आगीत तेल ओतणारे विरोधक विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्यासारखे विरोधक काँग्रेसचे नेते आणि शिवसेना उबाठाचे नेते याचा गैरफायदा घेणार यात काही शंका नाही. महागाईने अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो हे पाहिले असता असे लक्षात येते की महागाई ही बाजारात पैसा जास्त प्रमाणात आल्याने वाढते आणि पैसा कमी असल्यानेही वाढते. बाजारात पैसा जास्त झाला तर लोक हवी ती वस्तू मागेल त्या किमतीला खरेदी करतात आणि परिणामी महागाई वाढते. मोदी सरकार महागाईच्या बाबतीत पारदर्शक आहे आणि त्याने आकड्यांची कसलीही लपवालपवी केली नाही. ती काँग्रेसच्या काळात केली जायची. काँग्रेसने जो आरोप केला आहे, की गेल्या दहा वर्षांच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महागाईमध्ये सातत्याने भर पडली आहे. ती लोकांच्या रोषातून का व्यक्त होत नाही. कारण काँग्रेस खोटे बोलत आहे. जनता जर महागाईने त्रस्त असती तर मोदी सरकार कधीच उलथून पडले असते. पण जनता खुष आहे. त्यामुळे काँग्रेसचा दावा तकलादू आहे. पण हे निश्चित आहे की आता सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यांच्या तोंडावर महागाईचा दणका जनतेला बसला आहे, खास करून भाज्या आणि अंडी वगैरेची दरवाढ तर असह्य आहे. मोदी सरकार यातून काही तरी उपाययोजना काढेल यात काही शंका नाही. पण ग्राहक किंमत निर्देशांकात सतत नऊ महिने घसरणीनंतर ही वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणजे ऐन सणासुदीत अनेक वस्तूंच्या विशेष करून खाद्य पदार्थांच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे ही वाढ चिंताजनक तर आहेच. यावर उपाय म्हणजे सरकारने त्वरित काही तरी तोडगा काढून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा ही मागणी रास्त आहे. आर्थिक बाबतीत आपले अज्ञान असल्यामुळे महागाई वाढली की सरकारच्या नावाने बोंब ठोकायची अशी विरोधकांना सवय झाली आहे.ही महागाई सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली नाही. कारण या महागाईमुळे ग्राहकांसाठी वस्तूंच्या किमती आणि विशेष करून अन्नपदार्थांच्या किमती वाढू शकतात. हा परिणाम फारच नकारात्मक आहे आणि तो जास्त घातक आहे. १९९६ मध्ये दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत कांद्यांचे भाव चढले होते आणि त्यात सुषमा स्वराज सरकार याची आहुती पडली होती. तसे आता होणार नाही. पण मोदी सरकारने किरकोळही धोका पत्करण्याची तयारी दाखवू नये. कारण या किरकोळ महागाईमुळे रिझर्व्ह बँकेच्या धोरणात बदल होणार नसला तरीही जनतेला महागाईने पिडले आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही. तेव्हा महागाईवर सामान्य जनतेला दिलासा देण्याचा विचार तर सरकारने करायलाच हवा. हवामान बदलाचा परिणाम महागाईवर जाणवतो आणि त्याचाच फटका जनतेला बसला आहे. ग्राहकाना विशिष्ट वस्तूसाठी अधिक किमतीचा सामना करावा लागेल. कॅस्केडिंग इफेक्ट म्हणतात तो म्हणजे या किंमत वाढीचा परिणाम इतर वस्तूंच्या किमतीवरही होईल आणि ग्राहकांना त्याचे जास्त दाम मोजावे लागतील. आरबीआयच्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा ही वाढ कमी असली तरीही ऐन सणासुदीच्या काळात अन्नधान्य आणि भाज्या यांच्या किमतीत वाढ होणे हे चिंताजनक आहे. सारांश काय तर सरकारला यावर काही तरी तातडीचा उपाय शोधणे आवश्यक झाले आहे. आता मोठ्या निवडणुका नसल्या तरीही जनतेच्या कल्याणासाठी सरकारने काम करायला हवे आणि तसे ते जनतेला दिसायला हवे. त्यानुसार महाराष्ट्र आणि मोदी सरकारे वागतील अशी आशा आहे. कोणतेही सरकार नेहमीच लोकांच्या रडारवर असते आणि त्यानुसार मोदी सरकार असणार. पण तसे होऊ न देण्याची खबरदारी मोदी सरकारने घ्यायला हवी. कारण मोदी यांनी अच्छे दिन आणण्याची ग्वाही दिली होती. ती त्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्रामात महत्वाची भूमिका बजावणारे साळेगावचे स्वातंत्र्य सैनिक

**गौतम बचुटे । केज**

मराठवाडा मुक्ती संग्रामात निजामी राजवटीच्या विरुद्ध लढून मराठवाडा हा स्वतंत्र भारतात सामील होण्याच्या संग्रामात हिरहीरीने भाग घेऊन निझामी राजवटीचे बर्दापूरचे पोलिस ठाण्यावर हल्ला करून शस्त्रास्त्र लुटणारे साळेगावचे राजाभाऊ गालफाडे हे एक स्वतंत्र सेनानी होऊन गेले. त्यांचे नाव हैद्राबाद मुक्ती संग्रामातील गौरव ग्रंथाच्या पानावर कोरले गेले. त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील साळेगाव ता. केजचा उल्लेख त्यांच्या सहभागामुळे नोंदवला गेला.

निजामी राजवटीत आणि आताच्या मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात बर्दापूर येथे निझामाच्या रझाकारांचे पोलिस स्टेशन होते. बर्दापूर हे गाव मोमीनाबाद पासून १२० मैल अंतरावर होते. मोमीनाबादला निझामाच्या मिलिटरीचा तळ होता. त्यामध्ये ५०० घोडे व सैनिक असत तर बर्दापूर पोलिस ठाण्यात ३५ निझामांचे पोलिस असत. बर्दापूरची लोकसंख्या त्या काळी ५ ते ६ हजाराच्या आसपास होती. गावात बहुसंख्येने हिंदू असले तरी निझामाचे पोलिस त्यांच्यावर अन्याय अत्याचार करीत असत. यामुळे पोलिस ठाण्यावर हल्ला करून पोलिस ठाणे ताब्यात घ्यावे, ज्यामुळे शेजारच्या मोमीनाबादच्या मिलिटरी कॅम्पलाही धाक वाटेल आणि निजामी राजवटीत भीती निर्माण व्हावी यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी विचार करून बर्दापूर पोलिस ठाणे लुटण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांचे नेतृत्व करीत असलेले श्रीनिवास खोत यांच्या नेतृत्वाखाली ज्या १५ जणांची एक तुकडी होती; त्यामध्ये बीड जिल्ह्यातील साळेगाव तालुका केजचे राजाभाऊ गालफाडे यांचा समावेश होता. त्यांच्या सोबत प्रभाकर खेडकर, काशीनाथ मुकादम, अण्णा पाटील, सुखदेव हुले, पांडुरंग खरबडे, भीमा, दगडू ठोंबरे, भागवत मास्तर, हरीश्चंद्र जाधव, भगवान घुले, भानुदास सादोळेकर, विश्वनाथ लिंबगावकर, शेषराव सांगवी यांचा समावेश होता. स्वातंत्र्य सैनिकांना निजामी राजवटी विरुद्ध लढण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या आणि निजामाच्या राज्याच्या




हद्दी बाहेर असलेल्या आगळगाव कॅम्प पासून बर्दापूर हे सुमारे १०० मैल अंतरावर होते. या बर्दापूर पोलिस ठाण्याची गुप्त माहिती काढण्याचे काम हे राजाभाऊ गालफाडे आणि हरिश्चंद्र जाधव यांच्याकडे सोपवले होते. त्या दोघांनी बर्दापूर पोलिस ठाण्याची माहिती काढून तुकडीचे प्रमुख श्रीनिवास खोत व प्रभाकर खोडकर यांना दिली. १५ जणांच्या तुकडीचे दोन गटात विभागणी करण्यात आली. एक अण्णा पाटील यांच्या तुकडीत चार स्वातंत्र्य सैनिक होते. तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व खोत यांनी केले. राजाभाऊ गालफाडे आणि काशीनाथ मुकादम हे एका गटात होते. मध्यरात्रीच्या वेळी बर्दापूर पोलिस ठाण्यात काही पोलिस झोपण्याच्या तयारीत होते तर काही गस्त घालीत होते. त्यावेळी काशीनाथ मुकादम यांनी ठाण्यावर बॉम्ब फेकला. त्याबरोबर एक पहारेकरी खाली कोसळला. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू असताना श्रीनिवास खोत व प्रभाकर खेडकर यांच्या गटाने पोलिसांच्या बंदुका ताब्यात घेतल्या. या हल्ल्यामुळे काही पोलिस जीव वाचविण्यासाठी रेकॉर्ड रूममध्ये लपून बसले. हीच संधी साधून स्वातंत्र्य सैनिकांनी ३०३ च्या ११ बंदुका ताब्यात घेतल्या. तसेच नंतर पोलिस ठाण्यातील इतर दारूगोळा आणि शस्त्रास्त्रे ताब्यात घेतली. त्या नंतर निजामाची कुमक पोहोचण्या लुटीत हस्तगत केलेल्या बंदुका आणि दारूगोळा जास्त प्रमाणात असल्याने त्यांनी पाच-पाच बंदुकांचे लाकडी मोळी बांधतात तशा मोळ्या बांधून डोक्या वरून हत्यारे दारू गोळ्याच्या पेट्या वाहून नेल्या. हे सर्वजण सांगवी गावात आल्या नंतर गावकऱ्याऱ्यांनी स्वखर्चाने स्वातंत्र्य सैनिकांना जेवणाची व्यवस्था केली. त्या नंतर सांगवीहून ही सर्व शस्त्राने आगळगाव कॅम्प पर्यंत नेण्यासाठी किशनबुवा जोशी यांची बैलगाडी घेतली. या बैलगाडी सोबत सात स्वातंत्र्य सैनिक होते त्यामध्ये राजाभाऊ गालफाडे हे होते. तर उर्वरित स्वातंत्र्य सैनिक रेल्वेने बार्शीला जातील, असे ठरले. या सात जणांनी बैलगाडीत शस्त्रास्त्रे व दारुगोळा ठेवून त्याच्यावर कडबा रचण्यात आला. या प्रवासा दरम्यान अधूनमधून निजामाच्या फौजांचा गाड्यांची गस्त सुरू असतानाही त्यांना चुकवत सूर्योदया पूर्वी हे सर्वजण नियोजीत स्थळी सुखरूप पोहोचले.

या हल्ल्यात स्वातंत्र्य सैनिकां पैकी कोणीही जखमी झाले नाही. मात्र यात निजामाचे चार पोलिस मारले गेले. तर सात जखमी झाले. मराठवाडा मुक्ती संग्रामच्या गौरव ग्रंथात राजाभाऊ गालफाडे यांच्या नावाचा उल्लेख आहे.

_बर्दापूर पोलिस ठाण्यावर हल्ला केला त्या वेळी स्वातंत्र्य सैनिक हे शेतकऱ्यांच्या वेशात होते. बर्दापूर हल्ल्यात १५ स्वातंत्र्य सैनिकांनी निझामाचे ४ पोलिस मारले व ७ जणांना जखमी केले.

मराठवाडा मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील साळेगाव येथील राजाभाऊ गालफाडे यांच्या सोबतच दुसरे अंबादास गालफाडे हे देखील असत. तसेच तिसरे शामराव जाधव हे साळेगाव येथील रहिवाशी होते; मात्र त्यावेळी ते नांदुरघाट येथे राहत होते. तर चौथे स्वातंत्र्य सैनिक अंबादास झाडबुके हे केज तालुक्यातील शिंदी येथून नंतर साळेगावला येथे राहायला आले.

**_स्वातंत्र्य सेनानी श्रीनिवास खोत यांना पाण्यातून पाठीवर बसवून नदी पार करणारे विश्वनाथ महाजन :-** स्वातंत्र्य सेनानी श्रीनिवास खोत यांचा पाठलाग निजामाचे सैनिक करीत असताना ते धनेगाव येथून सोनेसांगवी तालुका केज येथे आले. मात्र त्यावेळी मांजरा नदी भरून वाहत होती त्यामुळे नदी पार करणे धोक्याचे असताना सोनेसांगवी येथील विश्वनाथ महाजन यांनी श्रीनिवास खोत यांना स्वतःच्या पाठीवर घेऊन त्यांना नदी पार करून पिंपळगाव पर्यंत सुखरूप नेवून सोडले आणि निजामाच्या सैनिकांना चकवा दिला.

**_काहींनी दिले माफीनामे :-** मराठवाडा मुक्ती संग्रामात साळेगाव येथील प्रभू स्वामी, लिंबाजी गित्ते, मारुती गित्ते, हरीराम मुळे, आश्राअप्पा मुळे यांचा देखील समावेश होता; परंतु त्यांनी त्याकाळी माफिनाने लिहून दिले. त्यामुळे त्यांचा उल्लेख स्वातंत्र्य सेनानी म्हणून कुठे आला नाही. अशी चर्चा होती.

# कोकणात निवडणुकीची मोर्चेबांधणी!

कोकणातील चारही जिल्ह्यांचा विचार करताना भारतीय जनता पक्ष, शिवसेना एकनाथ शिंदेगट या दोन पक्षांचे प्राबल्य आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रायगड जिल्ह्यात आहे. कोकणातील इतर जिल्ह्यांमध्ये मात्र दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्या-त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांपूर्ती मर्यादित आहे. त्यामुळे आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निश्चितच रंगतदार होतील. कोकणातील सर्वच पक्षनेते, कार्यकर्ते आपआपल्या पद्धतीने पक्षीय ताकद वाढविण्याचा प्रयत्न करतील. कोणत्याही पक्षाची ताकद ठरण्याचे परिमाण हे निवडणुका असते.

महाराष्ट्रातील जिल्हापरिषद अध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहीर प्रक्रिया दोन दिवसांपूर्वीच पार पडली. राज्यात सत्तेवर असलेल्या भाजप, शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि आरपीआय असे सत्ताधारी तर राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारगट, शिवसेना (उबाठा)अशी महाविकास आघाडी असे विरोधी पक्ष आहे. कोकणात मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीलाच मतदारांचा कौल मिळाला होता. त्यामुळे कोकणामध्ये महायुती सक्रिय आहे. महाविकास आघाडीत कोकणात तरी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या चारही जिल्ह्यांमध्ये आजही महाविकास आघाडी सक्रिय नाही. उबाठा शिवसेना कोकणात पत्रकबाजीतून सक्रिय आहे; परंतु लोकांमध्ये जाऊन त्यांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्षात कोणीही सक्रिय नाही. दोन दिवसांपूर्वी राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये पालघर जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. तर रत्नागिरी जिल्हा परिषद अध्यक्षपद नागरीकाचा मागास प्रवर्ग (महिला)साठी आरक्षित आहे. रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारणसाठी आहे. यामुळे रायगड आणि सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्हा परिषदेत जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी मोठी चुरस निर्माण होणार आहे. कोकणात महायुती आणि महाविकास आघाडीतही जिल्हा परिषद आपल्याकडे असावी यासाठी प्रयत्न केले जाणार. रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे अनेक दावेदार आहे. गेल्या दहा वर्षांनंतर होणारी ही जिल्हा परिषद निवडणूक असल्याने गेल्या काही वर्षातील सुप्त इच्छा अनेकांच्या मनात असणारच आहे. यावेळी आणखी एक बाब या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या



निमित्ताने घडणार आहे. राजकारणामध्ये सतत बदल घडत असतात. राजकीय कालप्रवाहात नवीन चेहरे सतत पुढे येतात. या निवडणुकीत त्याचाही प्रत्यय येणार आहे. 'कार्यकर्ता कम ठेकेदार' हा नवा कन्सेफ्ट राजकारणामध्ये आला आहे. पूर्वीचा प्रामाणिक कार्यकर्ता गेल्याकाही वर्षातील बदलत्या राजकारणात हरवला आहे. 'कार्यकर्ता कम ठेकेदार' सर्वच राजकीय पक्षांमध्ये उदंड आहे. यामध्ये ग्रामीण, शहरामध्येही सामान्य कार्यकर्ताच हरवला आहे. त्यामुळे या नव्या ट्रेंडची कुठल्याही पक्षात कमी नाही. ठेकेदारीतून आलेल्या पैशातून अध्यक्षपदाची स्वप्न सर्वच पक्षातील अनेकांना पडणारी आहेत. कोकणातील रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चारही जिल्ह्यांमध्ये प्रत्येक पक्ष आपल्याकडे जिल्हा परिषद अध्यक्षपद असावे यासाठी त्या-त्या पातळीवर प्रयत्न करतील. रायगड जिल्ह्यात पालकमंत्री पदावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारगट आणि शिवसेना शिंदेगट यांच्यामधून विस्तवही जात नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिंदे शिवसेना या दोघांमधील विळ्या-भोपळ्याचे नात सर्वश्रृत आहे. मात्र, तरीही जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकीत महायुती किंवा महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढविली जाईल, की स्थानिकस्तरावर मैत्रीपूर्व लढतीचा तोडगा स्वीकारून निवडणुका लढविल्या जातील हे आजच्या घडीला सांगण अवघड असेल, तरीही कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये निवडणुकीमध्ये महायुती म्हणून निवडणुकीला सामोरे जातील. जर महायुतीत काही जागी एकापेक्षा अनेक इच्छुक असतील तरीही समझोत्याने संयमाने त्यासाठी प्रयत्न होतील. महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आपला अधिकार आणि हक्क सांगण्याचा प्रयत्न करेलच. कोकणातील चारही जिल्ह्यांचा विचार करताना भारतीय जनता पक्ष, शिवसेना एकनाथ शिंदेगट या दोन पक्षांचे प्राबल्य आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रायगड जिल्ह्यात आहे. कोकणातील इतर जिल्ह्यांमध्ये मात्र दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्या-त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांपूर्ते मर्यादित आहे. त्यामुळे आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निश्चितच रंगतदार होतील. कोकणातील सर्वच पक्षनेते, कार्यकर्ते आपआपल्या पद्धतीने पक्षीय ताकद वाढविण्याचा प्रयत्न करतील. कोणत्याही पक्षाची ताकद ठरण्याचे परिणाम हे निवडणुका असते. यामुळे कोकणातील पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्याचे अध्यक्षपद हे आरक्षित झाले आहे. रत्नागिरी जिल्हा परिषद अध्यक्षपद नागरीकांचा मागास प्रवर्ग(महिला)साठी राखीव आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील महिला कार्यकर्त्यांमध्येही अध्यक्षपदासाठी मागास प्रवर्गातील महिला कार्यकर्त्या आपली वर्णी जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी लागावी यासाठी प्रयत्नशील असणारच आहेत. तर पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदावर अनुसूचित जमातीची व्यक्ती असणार आहे. त्यामुळे पालघरमध्येही आता चाचपणी करून जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा उमेदवार निश्चित करून पक्ष कामाला लागतील.कोकणातील बंदर विकासावर खूप वर्षांनी चर्चा होऊ लागली आहे. महाराष्ट्र मंत्री मंडळात कोकणच्या सुपूत्राकडे मत्स्य व बंदरे विकास खात्याचा कारभार आल्यावर खऱ्या अर्थाने गेल्याकाही वर्षात अवकळा आलेल्या बंदरांच्या विकासाला चालना देण्याची चर्चा होऊ लागली. कोकणातील बंदारांचा विकास त्याची चर्चा केवळ कागदावर न राहता बंदरांच्या विकासाचा प्रारंभ आणि कालबद्ध वेळेत त्याची पूर्तता करण्याचा निर्णय आता होत आहे. केवळ प्रकल्प कागदावर न राहता त्याची प्रत्यक्ष कार्यवाही झाली पाहिजे. तशा स्वरूपाचे प्रयत्न होताना दिसत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदराचा 'हब' म्हणून विकास होणार आहे. जयगड बंदर विकसित झाले तर कोकणातील आंबा, काजू, कोकम याचबरोबर मत्स्योत्पादन या बंदरातून परदेशात निर्यात होऊ शकेल. कोकणातील आजवर उपेक्षित राहिलेली अनेक बंदरे त्या-त्या भागाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवू शकतात. कोकणातील आंबा, काजू आदि फळांच्याबाबतीत वाहतुकीसाठी जलवाहतुकीचा एक मोठा अधिक सक्षम पर्याय उभा राहू शकतो. जयगड बंदर रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यातील काही भागातील बागायतदार शेतकऱ्यांसाठी अधिक उपयुक्त ठरणारे आहे. जयगड बंदराला एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी राज्य सरकारकडून सकारात्मक पावले उचलली आहे. त्याचा चांगला परिमाण येत्या काही काळात निश्चितपणे दिसेल.

# महाबोधी बुद्धविहार मुक्तीसाठी राष्ट्रीय कार्याध्यक्ष भिमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व्यापक आंदोलनाची तयारी

**बोरघर । प्रतिनिधी**

मुंबई आझाद मैदान ते मंत्रालय येथे महाबोधी महाविहार मुक्तिसाठी १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून नियोजित आंदोलनाची पूर्वतयारी करण्यासाठी आज दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी माणगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबडेकर सभागृह कालवा रोड येथे महत्वपूर्ण बैठक पार पडली. हि बैठक रायगड जिल्हा दक्षिण विभाग अध्यक्ष संतोष जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी भारतीय बौध्दमहासभा संस्कार उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य विजय कांबळे व भारतीय बौध्दमहासभा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु.जी.बोराडे यांनी आंदोलनच्या रणनितिचे सखोल विश्लेषण करत पुढील कार्ययोजना मांडली. या संपूर्ण आंदोलनाचे नेतृत्व दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्दमहासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव साहेब आंबेडकर करणार आहेत अशी माहिती बोराडे यांनी दिली असून प्रत्येक तालुक्यातून आंदोलन करण्यासाठी उपस्थित राहण्यास आवाहन केले आहे. येथे सर्वांनी एकजूट आणि सामुहिक प्रयत्नांनी महाबोधी महाविहार मुक्तीसाठी ठोस आंदोलन करण्याचे ठरवले आहे. हि बैठक रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये नवउत्साह निर्माण करणारी ठरली असून आगामी आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी ठोस पाऊल ठरणार असल्याचे सर्व उपस्थितांनी ठामपणे सांगितले.या बैठकीस संपूर्ण रायगड जिल्हा दक्षिण विभाग परुष व महिला कार्यकारिणी उपस्थित होते तसेच माणगाव, तळा,म्हसळा, महाड, श्रीवर्धन,रोहा,पोलादापूर या तालुक्याचे पुरुष व महिला कार्यकारिणी उपस्थित होते.

# मोदींचे परराष्ट्र धोरण हे अराजकतेचे व्याकरण

# अमेरिकेचे ५०% टॅरिफ मोदींच्या अपयशी आर्थिक परराष्ट्र धोरणाचा परिणाम-प्रकाश आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण हे भारतीय हितसंबंधांविरोधात अराजकतेचे व्याकरण ठरत असल्याचा घणाघात वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी केला. भारताचे पारंपरिक परराष्ट्र धोरण अमेरिका व रशिया यांच्यात संतुलन राखण्याचे आहे. पण मोदी सरकारचे अपयशी नेतृत्व व आर्थिक परराष्ट्र धोरणामुळे या दोन्ही देशांशी आपले संबंध बिघडले आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, आंबेडकरांनी मोदींवर मणिपूरवासीयांची क्रूर थट्टा केल्याचाही आरोप केला आहे.प्रकाश आंबेडकरांनी सोमवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी वरील आरोप केला. ते म्हणाले, भारताचे पारंपरिक परराष्ट्र धोरण हे अमेरिका व रशिया यांच्यात संतुलन साधण्याचे आहे. पण मोदी सरकारचे अपयशी नेतृत्व व आर्थिक परराष्ट्र धोरणामुळे भारताचे या दोन्ही देशांसोबतचे संबंध बिघडलेत. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या ५० टक्के रेसिप्रोकल टॅरिफमुळे भारत - अमेरिका संबंध १९७० च्या दशकातील स्थितीकडे फेकले गेलेत. तर रशियाचा चीनकडे वाढलेला कल आणि व्यापारात चिनी युआनची मागणी यामुळे भारतासाठी समस्या निर्माण होत आहे.प्रकाश आंबेडकरांनी यावेळी मोदींच्या धोरणांमुळे केवळ मुकेश अंबानी व त्यांच्या रिलायन्स कंपनीचेच उखळ पांढरे झाल्याचाही आरोप केला. मोदींच्या धोरणांचा सर्वाधिक फायदा मुकेश अंबानी आणि त्यांची कंपनी रिलायन्सला झाला. भारत रशियाकडून स्वस्त कच्चे तेल युरल्स क्रूड खरेदी करतो. रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताला प्रति बॅरल सरासरी ११ डॉलर्सचा नफा झाला. रिलायन्सने स्वस्त दरात रशियन तेल आयात केले, ते त्यांच्या रिफायनरीजमध्ये प्रक्रिया केले आणि परदेशात विकले. गेल्या तीन वर्षांत रिलायन्सने ५० हजार कोटींपेक्षा जास्त नफा कमावला. परंतु सामान्य जनतेला याचा कोणताही फायदा झाला नाही, कारण रिलायन्सने रशियन तेलावर प्रक्रिया करून ते परदेशात विकले.भारतात पेट्रोल प्रतिलीटर ९५ व डिझेल प्रतिलीटर ८८ च्या आसपासच राहिले. पण मोदींच्या धोरणाचा सर्वाधिक फायदा मुकेश अंबानी आणि त्यांची कंपनी रिलायन्सला झाला, असेही आंबेडकर यावेळी बोलताना म्हणाले.अमेरिकेचा ५० टक्के कर व रशियाचे चीनशी जवळीक साधण्याचे धोरण हे मोदींच्या अपयशी आर्थिक परराष्ट्र धोरणाचे परिणाम आहेत. हे भारतीय हितसंबंधांविरोधातील अराजकतेचे व्याकरण आहे, असे त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेचा ५० टक्के कर हा दलित समुदायांद्वारे चालवण्यात येणाऱ्या चामड्याच्या उद्योगासाठी मोठा धोका ठरेल. २०२०-२१ मध्ये चामडा उद्योगाची निर्यात ३.६ अब्ज डॉलर्स एवढी होती. ती २०२४-२५ मध्ये वाढून ४.८ अब्जांवर पोहोचली. अमेरिकेला होणारी निर्यात ६४५ दशलक्ष डॉलर्सवरून १.०४ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. यात ४०-५० टक्के घट झाली, तर ४-५ लाख नोकऱ्या जाण्याची भीती आहे. या व्यवसायात नोकऱ्या करणाऱ्यांत दलित समुदायांचे लोकसंख्या मोठी आहे, असेही ते यावेळी म्हणालेत.



# 'माझं कुंकू माझा देश'चा जाज्वल्य हुंकार

## ठाकरेंच्या शिवसैनिकांचा पाकिस्तानविरुद्ध एल्गार

**। अलिबाग । प्रतिनिधी**

आशिया कप २०२५ मधील भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याचा उत्साह जगभरात असला, तरी महाराष्ट्रात संतापाचा ज्वालामुखी फुटला आहे. पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचा हात उघड झाल्याने संपूर्ण देशभरातून संतापाची लाट उसळली असून, अशा रक्तरंजित पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या बलिदानाचा अपमान असल्याचा ठाम सूर उमटू लागला आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने 'माझं कुंकू माझा देश' या राज्यव्यापी आंदोलनाचा जाज्वल्य हुंकार देत पाकिस्तानविरोधी एल्गार पुकारला आहे. अलिबाग येथे या आंदोलनाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महिला आघाडीच्या महिला अग्रभागी उभ्या राहून भाजप कार्यालयासमोर कडकडीत निदर्शने केली. या वेळी रायगड महिला संघटिका शिल्पा घरत, उपजिल्हा संघटिका दर्शना पाटील, विधानसभा तालुका संघटिका तनुजा पेरेकर, मुरुड तालुका संघटिका राजश्री मिसाळ, अलिबाग उपतालुका संघटिका लीना घरत,




अलिबाग शहर संघटिका राखी खरवले, चौल ग्रामपंचायत माजी सरपंच रूपाली म्हात्रे, मुरुड विभाग प्रमुख मनाली पाटिल, ग्रामपंचायत सदस्य जागृती पिटकुर, संचिता भोईर आणि अलिबाग उपशहर प्रमुख सलोनी गिरी या सर्वजणींचा अग्रणी सहभाग होता.रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांनी अलिबाग येथील मध्यवर्ती कार्यालयातून भव्य मोर्चा काढला आणि थेट भाजप कार्यालयासमोर भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद, माझं कुंकू माझा देश अशा प्रखर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. आंदोलनाच्या ठिकाणी संतापाची लाट ओसंडून वाहत होती.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ठामपणे सांगितले की, पाकिस्तान सतत भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करतो. अशा देशाशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या रक्ताचा अपमान आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही, तोपर्यंत भारतीय संघाने पाकिस्तानशी सामना खेळू नये. केंद्र सरकारने या संदर्भात ठोस भूमिका घेत देशाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मानून निर्णायक पावले उचलली पाहिजेत.आज राज्यभर पेटलेलं 'माझं कुंकू माझा देश' आंदोलन हा केवळ क्रिकेट सामन्याला विरोध नसून, शहिदांच्या बलिदानाचा सन्मान राखण्यासाठी केलेला जाज्वल्य हुंकार आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबागेत शिवसैनिकांचा लढाऊ उत्साह पाहून पाकिस्तानविरोधी भूमिकेचा ठाम संदेश देशभर पोहोचल्याचं स्पष्ट झालं आहे.

# डी.वाय.पाटील डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ ऑनलाईनकडून 'लर्नर ॲप'चे लोकार्पण

## डिजिटल शिक्षणाच्या नव्या पर्वाची सुरुवात

**। नवी मुंबई । प्रतिनिधी**

भारतातील डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठत, डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ ऑनलाईन ने डी. वाय. पाटील लर्नर ॲप चे औपचारिक उद्घाटन केले आहे. हे आधुनिक मोबाइल लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम (ङचड) विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सुलभ, आणि सहभागी बनवण्यासाठी तयार करण्यात आले आहे.या ॲपद्वारे विद्यार्थी त्यांचे शिक्षण, नोकरी आणि वैयक्तिक आयुष्य यांचा समतोल राखत सहजपणे शिक्षण घेऊ शकतील. यामध्ये रिअल-टाइम कोर्स अपडेट्स, प्रगतीचा मागोवा, ऑफलाइन डाउनलोड्स, तसेच शैक्षणिक साधनांचा सहज वापर असे अनेक उपयुक्त फिचर्स देण्यात आले आहेत.ॲपच्या लोकार्पण समारंभास विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, उद्योगजगतातील तज्ज्ञ, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात ॲपची थेट कार्यप्रणाली



दाखवण्यात आली. उपस्थितांनी या पुढाकाराचे आधुनिक डिजिटल शिक्षणात मैलाचा दगड म्हणून कौतुक केले.मुंबईपासून जगभरातील विद्यार्थ्यांपर्यंत हे ॲप जागतिक दर्जाच्या प्राध्यापक व इंडस्ट्री मार्गदर्शकांशी जोडते. सीमांच्या पलीकडचे सर्वसमावेशक, जागतिक शिक्षण देण्याचे आमचे वचन आहे, असे डॉ. विजय डी. पाटील यांनी लोकार्पणप्रसंगी सांगितले.स्कूल ऑफ ऑनलाईनच्या म्हणण्यानुसार, लर्नर ॲप ही केवळ डिजिटल प्लॅटफॉर्मची भर नसून २०२५ मधील शिक्षणाचा नवीन मार्ग आहे- जिथे 'मोठं शिक्षण, छोट्या स्क्रीनवर' शक्य होते आणि तंत्रज्ञान वैयक्तिक आणि व्यावसायिक बदल घडवून आणते.या ॲपचा लाभ अनेक अंडरग्रॅज्युएट व पोस्टग्रॅज्युएट कार्यक्रमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे.

# आरोग्य सेवा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी परिषदेने पुढाकार घ्यावा-डॉ.विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आरोग्य व्यवस्थेला बळकट करण्याचे मोठे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.आता आरोग्य सुविधा सामान्य माणसा पर्यत पोहचविण्यासाठी सेवा धर्म मानून ग्रामीण भागात काम करून स्वताला सिध्द करा असे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मेडीव्हीजन या वैद्यकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या दोन दिवसांची राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.संपूर्ण देशातून चारशे प्रतिनिधींनी परीषदेस उपस्थित असून पद्मश्रीं डॉ विठ्ठलराव विखे पाटील फौडेशनच्या कॅम्पस मध्ये परीषदेचे आयोजन करण्यात आले




आहे.याप्रसंगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ मिलींद निकुंभ,अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री देवदत जोशी सह संघटन मंत्री बाळकृष्णजी मेडीव्हीजनचे संयोजक मौलिक ठक्कर विदर्भ प्रातांच्या सहसंयोजक सुप्रिया देशमुख शिवकुमारजी चिरगे फौडेशनचे डायरेक्टर डॉ अभिजीत दिवटे यांच्यासह परीषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,मागील दहा वर्षात आरोग्य आणि वैद्यकीय क्षेत्रात सर्वाधिक अर्थिक गुंतवणूक केंद्र सरकारने केली.ग्रामीण आणि शहरी भागात आरोग्य सुविधा निर्माण करतानाच लोकांना त्यांच्या घराजवळ आरोग्य सुविधा मिळतील असा प्रयत्न सरकारचा आहे.

केंद्र सरकारच्या धोरणामुळे प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय एम्सच्या धर्तीवर रूग्णालय निर्माण करण्यास मोदी सरकारने प्राधान्य दिले असून,आरोग्य क्षेत्राला विकास प्रक्रीयेशी जोडल्यामुळे आरोग्य सुविधांचे बळकटीकरण होवू शकले.वैद्यकीय क्षेत्रात आपण आपले करीअर घडवत आहात मात्र हे क्षेत्र सेवेचे आहे याचा विसर पडू देवू नका,आज ग्रामीण भागात अधिकचे काम करण्याची गरज आहे.वनवासी भाग तसेच कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्याचे सर्वात मोठे आहे.यासाठी काम करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे कार्यकर्ते शिक्षण क्षेत्राला संस्कृती परंपरा आणि राष्ट्रीय विचारधारेशी जोडून केवळ कार्यकर्ते नाहीतर आदर्श नागरीक निर्माण करण्याचे काम करीत आहे.सेवा कार्याच्या माध्यामातून परीषेदेने ७७वर्षाच्या केलेल्या यशस्वी वाटचालीचे मंत्री विखे पाटील यांनी कौतुक केले.याप्रसंगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ मिलींद निकुंभ मेडीव्हीजनचे संयोजक मौलिक ठक्कर यांची भाषण झाली.

# बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने श्रीमती राधा तांबे यांना आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

श्रीमती राधा तांबे गेल्या सहा वर्षांपासून योग क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी समाजासाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांनी योग शिबिरांचे आयोजन करून अनेक महिला तसेच वृद्धांना आजारमुक्त, निरोगी व आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा दिली आहे.विशेष म्हणजे, त्यांनी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धांमध्ये नेपाळ, थायलंड आणि व्हिएतनाम येथे सुवर्णपदके मिळवून देशाचा आणि राज्याचा मान उंचावला आहे. त्या 'राधिका ॲडव्हान्स योगा सेंटर, बीड'च्या संचालिका असून सध्या त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्रात योग प्रशिक्षण देत आहेत. उत्कृष्ट योग शिबिरांच्या माध्यमातून त्या रुग्णांना आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करत आहेत.त्या बीड जिल्ह्यातील एकमेव महिला योगप्रशिक्षक आहेत ज्यांनी बीड जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावले..एम ए योगशास्त्र पदव्युत्तर शिक्षण त्यांनी घेतले आहे



तसेच नॅचरोपॅथी अँड डायटीशियन चे शिक्षण त्यांनी पूर्ण केले आहे. या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांना 'आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.पुरस्कारासाठी नामांकित झाल्यानंतर श्रीमती राधा तांबे यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. संतोष मानूरकर, तसेच संयोजन समिती बीडचे श्री. नितीन क्षीरसागर (उपसंपादक, दै. दिव्य लोकप्रभा) यांचे मनःपूर्वक आभार मानले.तसेच दैनिक दिव्य लोकप्रभा आणि डॉ राधा तांबे यांच्या राधिका अँडव्हान्स योग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने यापूर्वी बीड शहरवासींसाठी मोफत योग शिबिर चे आयोजन देखील मागील वर्षी करण्यात आले होते. दैनिक दिव्य लोकप्रभा आपल्या प्रखर आणि निरपेक्ष कार्यासाठी तर प्रचलित आहेच मात्र अशा समाजहितासाठी अनेक उपक्रम राबवण्यासाठी देखील अग्रेसर आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्र पत्रकार संघासमवेत जिल्ह्यातील नामवंत आणि गुणवंत व्यक्तींचा सन्मान करण्याच्या कार्याबद्दल दैनिक दिव्य लोकप्रभा समूहाचे हार्दिक अभिनंदन तसेच आभार डॉ राधा तांबे यांनी व्यक्त केले.

या पुरस्कार प्राप्ती बद्दल जिल्ह्यातील अनेक पत्रकार बंधू आणि वृत्तपत्र समुहांनी श्रीमती राधा तांबे यांचे हार्दिक अभिनंदन केले.

# वादन एक कलाचा राजाचे उत्साहात विसर्जन

**उरण । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सर्वत्र साखर चौथीचे सार्वजनिक, वैयक्तिक रित्या गणेशोत्सव साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही उरण तालुक्यात साखर चौथीचे गणपती उरण मध्ये विराजमान झाले होते.साखर चौथीच्या गणेशोत्सवला शंभर वर्षांच्या काळाची परंपरा आहे.लोकमान्य टीळकांनी सुरु केलेला गणेशोत्सव संपूर्ण महाराष्ट्रात सार्वजनिक रूपात साजरा केला जातो.दहा दिवसांचा सार्वजनिक गणेशोत्सव संपला कि कोकण विभागात साखर चौथीच्या गणेशोत्सवला सुरवात होते.उरण शहरात वादन एक कलाचा राजा या ढोल ताशा पथकाच्या संघटने तर्फे श्री गजानन कृपा निवास, कामगार वसाहत,इनामदारवाडी, कामठा रोड उरण शहर येथे वादन एक कलाचा राजा २०२५ सार्वजनिक गणेशोत्सवचे आयोजन करण्यात आले होते. वादन एक कलाचा राजा या



संघटनेतर्फे दरवर्षी सार्वजनिक रित्या साखर चौथीचा सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाचे गणेशोत्सव साजरी करण्याचे संस्थेचे / संघटनेचे हे पाचवे वर्षे होते. गणेशोत्सव निमित्त सत्यनारायण महापूजा, महाप्रसाद,गेम्स, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, हौशी स्पर्धा आदी विविध मनोरंजन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.श्रीकृष्ण रूपातील गणेश मूर्ती व पर्यावरण पूरक सजावट हे यंदाच्या गणेशोत्सवचे सर्वांचे आकर्षण ठरले. वादन एक कलाचा राजाचे संस्थापक ओमकार घरत, अध्यक्ष तेजस म्हात्रे,उपाध्यक्ष मयूर केकतपुरे यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी,सर्व सदस्यांनी हा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. सदर गणेश मूर्तीचे उरण शहरातील विमला तलावात ढोल ताशाच्या गजरात मोठया उत्साहात विसर्जन करण्यात आले.

# जनावरे दगावली, पिके पाण्यात,जमिनी खरडून गेल्या; दादा, तातडीने मदत करा

## खा.बजरंग सोनवणे यांची पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे बैठकीत मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सलग तीन दिवस अतिवृष्टी झाली. नद्यांना आलेल्या पुराने पात्र सोडले असून आता पिकात पाणी आहेच पण अनेक ठिकाणी जमीन खरडून गेली आहे. विद्यूत पोल पडले आहेत. घरांची भिंतीही ढासळल्या असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे दादा, सरकारकडून तातडीने मदत द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे बैठकीत केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार हे दि.१६ रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असून सांयकाळी ६.३० जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्ह्यातील पूर व पीक परिस्थिती आढावा बैठक त्यांनी घेतली. यावेळी बैठकीला जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविधि खातेप्रमूखांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांवर मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीचे मोठे संकट कोसळले आहे. दि.१३ व १४ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पर्जन्यमानाची नोंद झाली असून जिल्ह्यातील १५ महसूल मंडळे अतिवृष्टीग्रस्त ठरली आहेत. त्यानंतर कालच्या मागील २४ तासांत पुन्हा एकदा सरासरी ३६.७ मि.मी.पर्जन्यमान झाले आहे. त्यातही १५ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी नोंदवली गेली आहे. जून ते सप्टेंबर या मान्सून हंगामात सरासरी ५६६.१ मि.मी. पर्जन्यमान होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात ६२०.६ मि.मी.इतका पाऊस झाल्याने मान्सून सरासरीच्या १०९ टक्के इतके पर्जन्यमान झाले आहे. हा पाऊस जिल्ह्यात अत्यंत असमान व अतिवृष्टीच्या स्वरूपात झाल्याने शेती, पशुधन व मानवी वसाहतींवर अतोनात संकट आले आहे. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील सोयाबीन, कपाशी, तुर आदी सर्व प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



अनेक शेतकऱ्यांची दुभती जनावरे व गुरेढोरे दगावली आहेत. ज्यामुळे त्यांचा उत्पन्नाचा आधार पूर्णपणे ढासळला आहे.राहती घरे पडल्याने अनेक कुटुंबे बेघर झाली असून रस्त्यावर आली आहेत, घरामध्ये साठवलेले धान्य, वियाणे, औषधे व जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या आहेत. अनेक ठिकाणी शेतातील सुपीक माती वाहून गेलो असून जमीन पिकवण्यायोग्य राहिली नाही. या सर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर प्रचंड आर्थिक संकट आले आहे. शेतकरी ज्यांच्या श्रमावर आपले जीवन व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात ते आज पूर्णपणे कोसळले आहेत, हा केवळ नैसर्गिक आपत्तीचा प्रश्न नाही, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वावर आलेले गंभीर संकट आहे. म्हणूनच, जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांना त्वरित दिलासा मिळावा यासाठी शासनाने नुकसानग्रस्त भागात तात्काळ व अचूक पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय नुकसान भरपाई द्यावी. पिकांचे नुकसान, जनावरांच्या मृत्यू, घरांचे पडणे व धान्याचे वाहून जाणे या सर्वांचा वेगळ्या-वेगळ्या गटांमध्ये सविस्तर अहवाल तयार करून त्यानुसार मदत द्यावी, शेतकऱ्यांना व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत मिळावी यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अतिवृष्टीमुळे जमीन नापीक झालेल्या शेतकऱ्यांसाठी विशेष पैकेज जाहीर करावे. जिल्ह्यातील अनेक छोटे-मोठे पाझर तलाव फुटुन त्याखालील परिसराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बेघर झालेल्या कुटुंबांसाठी तात्पुरती निवारा व्यवस्था तसेच घरकुल योजना राबवून त्यांचे पुनर्वसन करावे. पशुधन गमावलेल्या शेतकऱ्यांना विशेष अनुदान व विमा संरक्षण तातडीने द्यावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली. यावेळी पालकमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# रस्त्यांचे बोगस काम करणाऱ्या राजकमल कन्स्ट्रक्शन ला कायमस्वरूपी काळी यादीत टाकावे-वर्षा जगदाळे

## वर्षा पासून निवेदन आंदोलन करूनही प्रशासनाला जाग येईना पालकमंत्री अजित दादा तुम्हीच आता लक्ष घाला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास विभागाअंतर्गत कोट्यावधी रुपयांचे टेंडर बीड येथील मे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी घेतले आहे. जिल्हाभरातील राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या कामाची तक्रारी जिल्हाधिकारी यांच्यापासून ग्रामीण रस्ते विकास विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने गेल्या वर्षी रस्ते विकास विभागाच्या कार्यालयासमोर मोठे आंदोलन उभे करण्यात आले.अनेक तक्रारी करण्यात आल्या छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयात तसेच पुणे येथील कॉलिटी कंट्रोल विभागालाही तक्रार करण्यात आली मात्र भ्रष्ट अधिकारी व राजकीय वरदहस्त प्राप्त असल्यामुळे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी रस्त्यांची बोगस कामे करूनही यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. बीडचे पालकमंत्री शिस्तीचे व चांगले काम करून घेणारे अजित दादा पवार असल्याने या राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीची चौकशी करत तत्काळ या कंपनीला काळी यादीत टाकत अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



मे. राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याद्वारे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे काम सुरू आहे यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून ग्रामीण रस्ते विकास विभागाअंतर्गत कोट्यावधी रुपयांचे टेंडर राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आलेले आहे. गेवराई तालुक्यातील सात कामांची व बीड तालुक्यातील दोन कामांची तक्रार राजकमल कन्स्ट्रक्शनच्या विरोधात करण्यात आलेली आहे. यासाठी राष्ट्रीय विकास विभागाच्या कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. यासह जिल्हाधिकारी यांच्यापासून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालय व पुणे येथील कॉलिटी कंट्रोल कार्यालयाला आहे तक्रार करण्यात आली मात्र राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात अद्यापही कोणतेच ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. पालकमंत्री अजित दादा ह बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत, जिल्ह्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची कान टोचण्याचे धमक फक्त अजित दादा यांच्यातच आहे. राजमल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या भ्रष्टाचाराचा पाडा मोठा आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेले तक्रारींची व आंदोलनाची दखल घेत या भ्रष्ट कन्स्ट्रक्शन कंपनीच्या सर्व कामांची चौकशी करत या कंपनीला कायमस्वरूपी काळी यादीत टाकण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# शिव हे सर्व आत्म्यांचे पिता आहेत आणि तेजस्वी ज्ञानाचे सागर प्रजापिता ब्रह्मकुमारी प्रतिमा दीदी



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिव हे सर्व आत्म्यांचे पिता आहेत आणि तेजस्वी, ज्ञानाचे सागर, सर्वांच्या बोटीला पार नेणारे निराकार उपकारी आहेत. असे उदगार प्रजापिता ब्रह्मकुमारी प्रतिमा दीदी यांनी अपधूप या गावांमध्ये कार्यक्रम वेळी व्यक्त केले त्यानंतर पुढे त्या म्हणाल्या यावेळी की, शिवाला अकची फुले अर्पण केली जातात, अकचे फूल रंगहीन आणि सुगंधहीन असते, त्याचप्रमाणे कलियुगाच्या शेवटी सर्व आत्म्यांची स्थिती अशी झाली आहे, ना आत्मीयतेचा रंग आहे ना सद्गुणांचा सुगंध, अशा वेळी जेव्हा परमपिता, परमात्मा, कलियुगाच्या शेवटी प्रजापिता ब्रह्माच्या शरीरात अवतार घेतात, ज्याला संगमयुग देखील म्हणतात, त्या वेळी आपण आपले निस्तेज जीवन शिवाला अर्पण करावे आणि त्यांच्या आज्ञांचे पालन करावे आणि यश मिळवावे, दुसरे म्हणजे आपण धतूर देखील अर्पण करतो, धतूर विषारी आहे, म्हणजेच आपल्या जीवनातील दुर्गुण आपल्या जीवनात विष पसरवत होते, आपण ते जीवन भगवान शिवाला समर्पित करतो, त्या आठवणीत आपण धतूर आणि अकची फुले अर्पण करतो. यावेळी देवराम ढोले रामदास गाढवे. शिक्षणाधिकारी दिलीप थोरे अँड गवळी साहेब , मीना मेमाणे सुमन ढोले पार्वती गाढवे ,कदम गोकुळ गवळी हे उपस्थित होते

# सातपुड्याचा रानमेवा: सीताफळांना हक्काची बाजारपेठ मिळण्याची गरज

**मोलगी । रविंद्र वळवी**

सातपुड्याचा रानमेवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीताफळांचा हंगाम आता अंतिम टप्प्यात आला आहे. या हंगामात अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांना सीताफळांच्या विक्रीतून रोजगार मिळत असला, तरी या फळांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची या भागात नितांत गरज आहे. जर असे उद्योग सुरू झाले, तर स्थानिक बांधवांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत मिळू शकेल. सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये हजारो सीताफळांची झाडे नैसर्गिकरित्या वाढतात. सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांत या झाडांना सीताफळे मोठ्या प्रमाणात येतात. या काळात दुर्गम भागातील आदिवासी बांधव ही सीताफळे विक्रीसाठी धडगाव, मोलगी आणि अक्कलकुवा येथील बाजारात आणतात. विशेष म्हणजे, ही सीताफळे कोणत्याही रासायनिक खतांचा वापर न करता पिकवलेली असल्यामुळे ती चवीला अधिक गोड आणि स्वादिष्ट असतात. त्यामुळे महाराष्ट्रासह गुजरात आणि मध्य प्रदेशातही त्यांना मोठी मागणी आहे. बाजारात घाऊक व्यापारी तसेच स्थानिक नागरिकही सीताफळांची खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी करत आहेत. आदिवासी बांधव सीताफळे टोपलीमध्ये भरून विक्रीसाठी आणतात. मोठ्या टोपलीतील सीताफळे साधारणपणे अडीचशे ते तीनशे रुपयांना, तर लहान टोपलीतील सीताफळे दीडशे ते दोनशे रुपयांना विकली जात आहेत. याचा सरासरी भाव प्रति



किलो तीस ते पस्तीस रुपये इतका आहे.सीताफळ हे पिकल्यानंतर एक-दोन दिवसांत खराब होणारे फळ आहे. त्यामुळे ते जास्त दिवस साठवता येत नाही, आणि व्यापाऱ्यांना किंवा शेतकऱ्यांना त्याचा मर्यादितच वापर करता येतो. यावर उपाय म्हणून, जर सीताफळावर प्रक्रिया करून त्याचे विविध पदार्थ (उदा. पल्प, आईस्क्रीम, बासुंदी) तयार केले, तर त्यातून स्थानिक आदिवासी बांधवांना अधिक पैसे कमावण्याची संधी मिळू शकेल. तसेच, यामुळे रोजगाराच्या नवीन संधीही निर्माण होतील.स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी शासनाकडे तसेच लोकप्रतिनिधींकडे यासंदर्भात ठोस पाऊले उचलण्याची मागणी केली आहे. सातपुड्यात सीताफळ आणि आमसूल यांसारखी नैसर्गिक फळे मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने, त्यांच्यावर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू करणे हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो, असे मत व्यक्त होत आहे. जर या भागात असे उद्योग उभे राहिले, तर आदिवासी बांधवांचे जीवनमान नक्कीच सुधारेल.

# क्रिकेट व फुटबॉल खेळाडूंना हक्काचे मैदान मिळालेच पाहिजे

## बीड शहर बचाव मंच व बीडकरांची अजितदादांकड एकच मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा स्टेडियम मध्ये क्रिकेट व फुटबॉल या खेळांसाठी पूर्ववत हक्काचे मैदान तयार करून उपलब्ध करून द्या या प्रमुख मागणीसाठी बीड जिल्हा कार्यालयासमोर बीड शहरातील तमाम शेकडो खेळाडूंच्या तसेच पालक, प्रशिक्षक व असंख्य क्रीडाप्रेमींच्या समवेत बीड शहर बचाव मंचाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. बीड शहरातील मध्यवर्ती भागातील बीड जिल्हा स्टेडियम हे सुरुवातीपासूनच ऑल जनरल स्पोर्ट्स या पद्धतीने सातत्याने उपयोगात आहे. या स्टेडियम खेरीज बीड शहरामध्ये खेळाडूंच्या सरावासाठी कुठेही सोयीस्कर पद्धतीचे मैदान उपलब्ध नाही. याच मैदानाने 'सचिन धस' सारखे विद्यापीठ स्तरापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळणारे मोठमोठे नामवंत शेकडो खेळाडू घडवले



आहेत. वय वर्ष ४ पासून ते २५ पर्यंत ५०० ते ८०० खेळाडू नियमित दररोज येथे सराव करत असतात. अंडर १२,१४,१५,१९,२३ वयोगटातील राज्यस्तरावरील खेळाडू येथे सराव करतात. ६० ते ७० खेळाडूंनी विद्यापीठ ते राष्ट्रीय संघापर्यंतच्या सामन्यात प्रतिनिधित्व केलेले आहे. थलेटिक्स व वैयक्तिक क्रीडा प्रकारातील खेळांसोबतच क्रिकेट व फुटबॉल साठी देखील उत्कृष्ट अभियांत्रिकी तंत्राचे सहाय्य घेऊन कल्पकतेने निश्चित करून पूर्ववत हक्काचे मैदान कायम देता येईल. क्रिकेटच्या नेट प्रॅक्टिसिंग साठी येथे मैदान देणे शक्य आहे. तरी शासनाने, प्रशासकीय तज्ज्ञाने याचा सखोल अभ्यास करावा. बीड शहर बचाव मंच तसेच बीड शहरातील जनतेचा, खेळाडूंचा व क्रीडा प्रेमींचा शहरात होणाऱ्या क्रिडा विकास प्रकल्पाला अजिबात विरोध नाही, याउलट पूर्ण समर्थनच आहे. बीड शहरामध्ये उभारल्या जाणाऱ्या या अत्याधुनिक क्रीडा प्रकल्पामध्ये इतर सर्व खेळांसोबतच क्रिकेट आणि फुटबॉल या खेळांनाही त्यांचे हक्काचे मैदान निश्चित करून कायमस्वरूपी देण्यात यावे या प्रमुख मागणीचे निवेदन आज जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला देण्यात आले. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रा डि.जी. तांदळे सर, कॉ. नितीन जायभाये, कॉ.ज्योतीराम हुरकुडे, चंद्रकांतभाऊ हुरकुडे, मोमीन मुशरफ मझहर, जीशान फारोकी, इजहानभाई,कायदेशीर सल्लागार ड.अनिल बारगजे, ड.नितीन वाघमारे, सीनियर प्रशिक्षक अजहर शेख,परवेझभाईसर, लोकप्रिय क्रिकेटर संजय (तात्या) धस, सुनील वाघमारे, नासेर तांबोळी, राहुल जाधव, शैलेश जाधव, संतोष खेडकर, अनिल वाघमारे, सचिन वडमारे, राजेश धनधाव, हनुमान मागधरे, सुनील नागरगोजे, पठाण सर, बालाजी घरत, प्रकाश गालफाडे,अविनाश खेडकर, संजय कुलकर्णी, भारत मुंजाळ, हनुमान पवळ, युवराज ससाने, राजेंद्र घोडके आदी अनेक सर्व क्रीडा क्षेत्रातील लोकप्रिय व्यक्तींची प्रमुख उपस्थिती होती.

# संगमेश्वर बस स्थानकाला गरज असलेल्या बस फेऱ्या सुरु करण्याची संगमेश्वर व्यापारी संघाची मागणी;बेळगाव संगमेश्वर बस फेरी संगमेश्वर पर्यंत परत यावी

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

संगमेश्वर पंचक्रोशीतील प्रवाशांच्या सोयीसाठी संगमेश्वर बसस्थानकाचे नुतनीकरण , पालकमंत्री उदय सामंत, आमदार किरण सामंत यांच्या प्रयत्नांमुळे झाले असून, हे नूतनीकरण निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, या सुसज्ज बसस्थानकाला अजूनही देवरुख आगाराकडून पुरेशा प्रमाणात बस सेवा मिळत नाही, अशी तक्रार प्रवाशांमधून तसेच व्यापारी वर्गातून येत आहे.सध्या विद्यार्थ्यांकरिता तसेच आडगावातील प्रवाशांसाठी पूर्वी सुरु असलेल्या अनेक बसफेऱ्या प्रवासी संख्या कमी असे कारण पुढे करत बंद करण्यात आल्या आहेत. विशेषतः संगमेश्वर-बेळगाव-देवरुख ही महत्त्वाची बस फेरी देखील सध्या संगमेश्वर बस स्थानकात न येता देवरुख येथेच थांबते. यामुळे संगमेश्वर बस स्थानकातून प्रवास करणाऱ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागते.बस पुढे न पाठवण्यामागे प्रवासी संख्या किंवा कर्मचाऱ्यांचा ओव्हरटाईम यांसारखी कारणे दिली जात आहेत, मात्र ही सेवा प्रवाशांच्या सोयीसाठी असते, हे विसरले जात आहे.या पार्श्वभूमीवर संगमेश्वर व्यापारी संघाचे अध्यक्ष यांनी आगार व्यवस्थापक, देवरुख यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असून, संगमेश्वर बसस्थानकासाठी आवश्यक बस फेऱ्या, विशेषतः बेळगाव-संगमेश्वर बस सेवा पूर्ववत सुरु करण्याची मागणी केली आहे. तसेच इतर बस फेऱ्याही सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077